# परमात्म्याचा परिचय




## प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय

पांडव भवन, आबू पर्वत, राजस्थान.

# परमात्म्याचा परिचय

## प्रस्तावना

''परमात्मा एक आहे'' असे जगातील सर्व धर्मांचे लोक म्हणतात परंतु व्यवहारात ते तसे मानतातच असे काही दिसून येत नाही; नाहीतर धर्मांधर्मांमध्ये भांडणे झालेली दिसली नसती. सर्व गुण्यागोविंदाने एकत्र राहिले असते. तसे काही आढळत नाही. याचे कारण परमात्म्याबद्दलचे पूर्ण सत्य ज्ञान त्यांना झालेले नाही असे म्हणावे लागेल. एक हत्ती व सहा आंधळे या गोष्टीतल्या आंधळ्यांप्रमाणे प्रत्येक जण आपलेच म्हणणे खरे आहे असे म्हणून दुसऱ्याशी भांडत आहे.

जेथे स्वतःचा परिचय स्वतःच (किंवा स्वतःच्या माता-पित्यांनी) दिल्याशिवाय या जगात कोणी कोणाला ओळखू शकत नाही, तेथे सर्वांचा माता-पिता असलेल्या परमात्म्याचा परिचय स्वतः परमात्म्याने दिल्याशिवाय त्याला कोण कसे बरे ओळखू शकेल! ते अशक्यच आहे. तेव्हा आतापर्यंत परमात्म्याबद्दल जे काही आपण ऐकत किंवा वाचत आलो आहोत ते माणसाने केवळ आपल्या तर्कावरच आधारलेले आहे. त्यात सत्य नाही. सत्य काय ते एक परमात्माच सांगू शकतो.

तेव्हा, परमात्मा आपला परिचय केव्हा, कसा आणि कशासाठी देतो हे या छोट्याशा पुस्तकात थोडक्यात दिले आहे. त्यात काल्पनिक, तार्किक असे काहीच नाही. जे आहे ते त्याने स्वतःच दिलेल्या सत्य ज्ञानावरच आधारित आहे. जिज्ञासूंनी अधिक माहितीसाठी पुस्तकाच्या शेवटी दिलेल्या ईश्वरी सेवा केंद्रांशी संपर्क साधावा, ही विनंती.

# परमात्मा कोण ?

या जगात परमात्मा या शब्दाशी साधारणतः कोणीही माणूस अपरिचित नसेल परंतु परमात्म्याचा वास्तविक परिचय किंवा यथार्थ ज्ञानापासून सर्व मनुष्यात्मे आजतागायत अनभिज्ञ राहिले आहेत. प्रत्येक माणूस आपल्या शारीरिक पित्याचे नाव, रूप, कर्तव्य इत्यादी जाणतो; नगरवासी आपल्या महापौराला ओळखतात, सर्व प्रांतवासी आपल्या राज्यपालाशी परिचित असतात, तसेच सर्व देशवासी आपल्या देशाच्या राष्ट्रपतीला जाणतात. याचप्रकारे साऱ्या विश्वाच्या विश्वाधिकाऱ्याचे अस्तित्वही अनिवार्य आहे. परंतु या विश्वात राहणाऱ्या सर्व मनुष्यात्म्यांना त्या विश्वाधिकारी परमपिता परमात्म्याचे ज्ञान आहे का ? आश्चर्याची गोष्ट अशी की, सर्व जीवात्मे आपल्या लौकिक तसेच विनाशी संबंधांना चांगल्या रीतीने जाणतात. परंतु आपल्या पारलौकिक अविनाशी परमपिता परमात्म्याला पूर्णतया विसरून गेले आहेत.

याच अज्ञानामुळे सर्व आत्म्यांचा संबंध किंवा योग ठीक प्रकारे परमात्म्याशी न जुळल्यामुळे ते संपूर्ण पवित्रता, सुख, शांती व शक्ती या आपल्या ईश्वरी जन्मसिद्ध अधिकाराला मुकले आहेत. कारण ज्ञानाशिवाय संबंध जुळत नाही व संबंधाशिवाय प्राप्ती होत नाही. ते जन्मजन्मांतर वेद, पुराण, तसेच शास्त्र इत्यादीचे पठण–पाठण आणि मनन-चिंतन त्याचप्रमाणे जप, तप, तीर्थ, यज्ञ, हवन, संध्या, दान आणि पुण्य करीत असूनही दिवसेंदिवस दुःखी अशांत आणि पतित बनत गेले आहेत. ज्याप्रमाणे एका विजेच्या दिव्याचा संबंध (Connection) यथार्थ रीतीने वीज-घराशी (Power House) नसेल तर त्यात केव्हाही प्रकाश किंवा शक्तीचा संचार होऊ शकणार नाही त्याचप्रमाणे मनुष्यात्म्याचा परमात्म्याशी यथार्थ संबंध जुळल्याशिवाय सुख, शांती, पवित्रता प्राप्त होऊ शकणार नाही.

आजपर्यंत जे कुणी ऋषी, मुनी, संन्यासी, भक्त, धर्मसंस्थापक होऊन गेले, त्यांनी परमात्म्याच्या गुणांची अपार महिमा गायली

आहे; तरीपण "परमात्मा कोण आहे?" याचे समाधानकारक व सत्यज्ञान होऊ शकले नाही. आणि आजतागायत ते एक मोठे कोडेच होऊन बसले आहे. परमात्मा एक शक्ती आहे आणि तो नावरूपरहित आहे असे सर्वसामान्यपणे मानले जाते. पण वास्तविक शक्ती हा एक गुण आहे आणि तो धारण करण्यात येतो. तेव्हा गुण असताना तो धारण करणाऱ्या परमात्म्याच्या नाव, रूपाचे अस्तित्व न मानणे हे कसे शक्य आहे? ज्याप्रमाणे सुगंध, गोडी इत्यादी गुण वस्तुमात्राचे असतात; त्यांना नाव, रूप नसते. याचा अर्थ असा नव्हे की गुण धारण करणाऱ्यालाही नाव, रूप असू नये. उदाहरणार्थ– जसे सुगंध हा तर गुण आहे. त्याला ना रूप, ना आकार; पण तो धारण करणाऱ्या फुलाला तर नाव, रूप असते ना!

**परमात्म्याचे रूप**

एखाद्या वस्तुचे रूप चर्मचक्षूंना दिसणार नाही असे होऊ शकते, परंतु एखाद्याचे अस्तित्व असावे पण रूप नसावे ही गोष्ट अशक्य आहे. त्याचप्रमाणे परमात्माही रूपरहित नाही. त्या दिव्य व अव्यक्त सत्ताधीशाला रूप अवश्य आहे परंतु ते दिव्य व अव्यक्त असल्याकारणाने दिव्यचक्षूने पहाता येते. परमात्म्याला निराकार म्हणण्याचा अर्थ असा नाही की त्याला नाव रूपच नाही. वास्तविक निराकार शब्द सापेक्ष आहे, अर्थात अन्य आत्म्यांच्या शारीरिक रूपांशी तुलना करण्यासाठी त्याचा वापर केला जातो. अन्य आत्मे स्थूल किंवा सूक्ष्म शरीर धारण करतात परंतु परमात्मा जन्ममरणापासून अलिप्त आहे. जे आत्मे स्थूल देह धारण करतात त्यांना 'साकार' असे म्हणतात आणि जे आत्मे सूक्ष्म देह धारण करतात त्यांना 'आकारी' देवता म्हणतात. परंतु



पवित्र आणि योगी व्हा

परमात्म्याला स्वतःचे असे साकारी शरीर नाही आणि सूक्ष्म किंवा आकारी शरीरही नाही, म्हणून त्याला 'निराकार' म्हटले जाते. तेव्हा, निराकारचा अर्थ आहे "अशरीरी, अकाय, अव्यक्त". परमात्मा रूपापासून वेगळा नाही तर त्याचे रूप आगळे वेगळे आहे. परमात्म्याचे दिव्य रूप–"ज्योतिर्बिंदू" अर्थात ज्योतिसदृश आहे.

**परमात्म्याचे नाव**

जगात जेवढे म्हणून मनुष्यात्मे आहेत त्यांची नावे देहाच्या आधारावर ठेवली जातात. वर्तमान देह धारण केल्यानंतर म्हणजे जन्म झाल्यावर ब्राह्मण, माता-पिता किंवा कुणी महात्मा त्यांचे नामकरण करतात व तो देह बदलल्याबरोबर पुढच्या जन्मात मनुष्यात्म्याचे नाव बदलते. यावरून स्पष्ट होते की मनुष्यात्म्याचे नाव विनाशी व देहावर आधारीत आहे. परंतु परमात्मा अशरीरी आहे. तो जन्ममरणाच्या चक्रात येत नाही, म्हणून त्याचे नावही अविनाशी, अपरिवर्तनीय आणि दिव्य आहे. तेव्हा, परमात्मा नावापासून वेगळा आहे असे म्हणणे अयथार्थ आहे. फार तर आपण असे म्हणू शकतो की, परमात्म्याचे नाव आम्हा देहधाऱ्यांपेक्षा आगळे आहे. ते दिव्य नाव आहे **'शिव'**. शिव म्हणजे (१) कल्याणकारी (२) बीजरूप आणि (३) बिंदू! कारण परमात्मा साऱ्या सृष्टीचा सद्गतिदाता आहे, म्हणून त्याला कल्याणकारी असे म्हणतात. ज्याप्रमाणे बीजापासून वृक्षाची निर्मिती होते त्याचप्रमाणे परमात्मा शिव सुद्धा या मनुष्यसृष्टीरूपी वृक्षाचा निर्माता असल्यामुळे त्याला वृक्षपती किंवा मनुष्यसृष्टीचे बीजरूप म्हणतात. शेवटी परमात्म्याचे रूप ज्योति-बिंदूसमान आहे. यावरून स्पष्ट आहे की, परमात्म्याचे 'शिव' हे नाव संपूर्णतः यथार्थ आहे.

**परमात्म्याचे स्मृति-चिन्ह 'शिवलिंग'**

सर्व महान विभूतींची स्मृती राहावी म्हणून त्यांची स्मृतिचिन्हे, मूर्ती, मंदिरे इत्यादी करण्यात येतात. परंतु या जगात सामान्यतः सर्व

मूर्तींमध्ये अधिक पूजा शिवलिंगाची केली जाते. अखिल विश्वात क्वचितच असा एखादा देश असेल जेथे शिवलिंगाची पूजा होत नाही. 'शिव' याचा अर्थच आहे कल्याणकारी बीजरूप परमात्मा व 'लिंग' म्हणजे प्रतिमा किंवा स्मृति-चिन्ह. म्हणून शिवलिंग म्हणजे कल्याणकारी परमपिता परमात्म्याची प्रतिमा. प्राचीन काळात शिवप्रतिमा प्रकाशमान हिऱ्यांची केली जात होती. कारण, परमात्म्याचे रूप ज्योतिर्लिंगम् आहे. जगातील सर्वोत्तम अशा कोहिनूर हिऱ्यापासून बनविलेल्या शिवलिंगाची स्थापना सर्वप्रथम, सोमनाथ येथील प्रसिद्ध मंदिरात झाली होती. अनेक धर्मांमध्ये परमात्म्याच्या याच स्वरूपाला मान्यता दिली गेली आहे. जरी अन्य धर्मातील लोक हिरे, पाषाण किंवा अन्य धातूंची त्याची स्थायी रूपात मूर्ती स्थापन करीत नसतील, तरी देखील पूजा, पाठ, प्रार्थना आणि अन्य शुभसमयी ज्योतिस्वरूप परमप्रिय परमात्म्याच्या स्मरणार्थ आपल्या घरी किंवा धार्मिक ठिकाणी म्हणजे मंदिरे, मशिदी, गुरूद्वारे, चर्च इत्यादींमध्ये दीपक किंवा ज्योती अवश्य लावतात. भारतात शिव परमात्म्याच्या बारा अतिप्रसिद्ध मठांना 'ज्योतिर्लिंगम् मठ' असे म्हणतात त्यांपैकी हिमालयातील केदारेश्वर, माळव्यातील विश्वेश्वर, सौराष्ट्रातील सोमनाथ, उज्जैनमधील महाकालेश्वर, काशीचे विश्वनाथ, वृंदावनचे गोपेश्वर आणि दक्षिणेतील रामेश्वर फार प्रसिद्ध आहेत. भारताच्या बाहेरही निकटवर्ती व दूरवर्ती देशांमध्ये हिंदुमतापेक्षा भिन्न मत असलेले अनुयायी लोक देखील शिवलिंगाच्या मूर्तीला बराच सम्मान देत असतात. जरी आज ईसाई, मुसलमान,बौद्ध आणि इतर मतांचे लोक शिवलिंगाची हिंदूप्रमाणे पूजा करीत नसतील, तरीपण असे पुष्कळ पुरावे मिळतात ज्यावरून सांप्रत सुद्धा अनेक विभिन्न मतांचे लोक शिवलिंगाला धार्मिक महत्व देत आहेत असे दिसून येईल. उदाहरणार्थ—इटली देशातील रोम शहरात ईसाई धर्माचे रोमन कॅथॉलिक लोक या अंडाकार रूपाच्या पाषाणाची आजही पूजा करतात. अरब देशात मक्केच्या पवित्र

तीर्थस्थानावर मुसलमान यात्रेकरू याच आकाराच्या पाषाणाला 'संग-ए-असवद्' किंवा मक्केश्वर म्हणतात व हजयात्रा सफल करण्यासाठी अजूनही त्याचे चुंबन घेतात. जपानमध्ये राहणारे बौद्ध धर्मातील अनेक लोक जेव्हा साधना करण्यासाठी बसतात तेव्हा स्वतःसमोर शिवलिंगाच्या आकाराची एक प्रतिमा तीन फूट अंतरावर व तीन फूट उंचीच्या एका तिवईवर ठेवून त्यावर ध्यान केंद्रित करतात. इजराईल तसेच अन्य देशातील यहुदी लोक एखादी शपथ घेताना त्यांच्या पद्धतीप्रमाणे, शिवलिंगाच्या आकाराच्या दगडाला स्पर्श करतात. या व्यतिरिक्त प्राचीन व प्रसिद्ध मिश्र देशातील फोर्नेशिया शहरात व इराणमध्ये सिरिया शहरात तसेच युनान, स्पेन, जर्मनी, स्कँन्डेनेव्हिया, अमेरिका, मेक्सिको, पेरू, हैती द्वीप, सुमात्रा, जावा इत्यादी विभिन्न भागांत शिव परमात्म्याचे हे पार्थिव स्मृति-चिन्ह आढळून येते. इतकेच नव्हे तर स्कॉटलंडचे प्रमुख शहर ग्लासगोमध्ये, तुर्कस्तानमधील ताश्कंदमध्ये, वेस्ट इंडीजचे शहर ग्वायनामध्ये तसेच लंका व सयाममध्ये आणि मॉरिशस-मादागास्कर येथेही शिवलिंगाचे पूजन होते.

अनेक धर्मात मतभेद आढळल्यामुळे अन्य देशांत शिवलिंगाची लोकप्रियता पहिल्यासारखी राहिली नसेल, तरीपण जेथून त्याची पूजा प्रारंभ होऊन परदेशात गेली, त्या भारतात आजही लोकांना ते अतिप्रिय आहे, श्रीरामचंद्राला रामेश्वरात, श्रीकृष्णाला गोपेश्वरात व अन्य देवतांनाही, त्या सर्वांचा परमपूज्य ईश्वर 'शिव' परमात्मा आहे, हे दर्शविण्यासाठी शिवलिंगाची पूजा करताना दाखविले जाते. म्हणून सर्वांना निःसंशय हे मान्य करावे लागेल की अखिल सृष्टीतील कोणत्याही धर्म किंवा सांप्रदायाच्या आत्म्यांचा परमपिता एकमात्र परमप्रिय परमात्मा ज्योर्तिलिंगम् शिवच आहे.

**शिव परमात्म्याविषयी लोकांत असलेल्या गैरसमजुती**

सांप्रत भारतात शिवलिंगाची पूजा बरीच व्यापक असूनही शिव परमात्म्याच्या बाबतीत अशा पुष्कळ गैरसमजुती निर्माण

करणाऱ्या असंबद्ध कथा प्रचलीत आहेत, ज्यावरून सिद्ध होते की लोक आपल्या परमपूज्य शिवाच्या विषयी काहीही जाणत नाहीत. शिव परमात्म्याच्याविषयी पुष्कळ पौराणिक कथा द्वापर आणि कलियुगातील लेखकांच्या कल्पनेवर आधारित आहेत. त्या अतिशयोक्ती, भेसळ आणि कपोलकल्पित वृत्तान्तांनी भरपूर आहेत. या कथांमध्ये शिव परमात्म्यावर वृथा आरोप लादलेले दिसून येतात. या काल्पनिक वृत्तान्तांत शिवाचे पार्वतीवर मोहीत होणे, दक्ष प्रजापतीने आपल्या सत्तावीस कन्यांचे विवाह चंद्राबरोबर करणे व नंतर त्यांना शाप देणे इत्यादींचे जे वर्णन आहे त्यांना निव्वळ गप्पा नाही तर काय म्हणावे? परमपिता शिव आणि त्याने निर्मिलेले ब्रह्मा, विष्णू, शंकर यांच्याविषयीही अज्ञान असल्यामुळे परिणामत: लोकांमध्ये मतभेद निर्माण होऊन शिवपरमात्म्यावर एकीकडे कामवासनेचा कलंक लावतात तर दुसरीकडे त्यालाच मदनान्तक किंवा कामारि असेही म्हणतात. कधी कधी विष्णूला परमात्मा सिद्ध करण्याच्या उद्देशाने ब्रह्मा व शंकराची ग्लानी करतात किंवा कोण्या दोन देवतांचे युद्ध इत्यादिकांच्या दंतकथा प्रस्तुत करतात. दुसरी लक्ष देण्यायोग्य गोष्ट अशी की अज्ञानवश होऊन भक्त शिव आणि शंकराला एकच सत्ता समजतात (शिव आणि शंकरातील भेद याच पुस्तिकेत पुढे स्पष्ट केला आहे) तम:प्रधान बुद्धी असल्यामुळे कित्येक लोक आकारी महादेव शंकराला एक व्यक्त मनुष्य समजतात आणि शिवाला शंकराचे शारीरिक लिंग समजून त्याची पूजा करतात. भारतातील लोकांच्या अशा तुच्छ आणि क्षुद्र बुद्धीची कीव करावी तेवढी थोडीच!

**परमात्मा व आत्मा यांमधील अंतर**

परमात्मा (परम+ आत्मा) शब्दच सिद्ध करतो की आत्मे अनेक आहेत व त्यांमध्ये एका विशिष्ट आत्म्याचे (परमात्म्याचे) अस्तित्व भिन्न व सर्वोच्च आहे, जसे प्रधानमंत्री (प्रधान+ मंत्री) ज्येष्ठपूत्र (ज्येष्ठ+ पुत्र) इत्यादी शब्दांची यथार्थता तेव्हाच सिद्ध होईल जेव्हा

अन्य मंत्री असतात व त्यांच्यामध्ये प्रधानमंत्र्याची योग्यता, अधिकार, कर्तव्ये अधिक असतात, किंवा इतर पुत्रही असतात, ज्यांच्यामध्ये अमुक पुत्र ज्येष्ठ असतो. पुष्कळ लोकांची समजूत अशी आहे की आत्मा परमात्म्याचा अंश आहे व सर्वांना मिळून परमात्मा म्हटले जाते (जसे पाण्याच्या अनेक थेंबांचा मिळून सागर बनतो). परंतु 'परम' शब्द गुणवाचक (Qualitative) आहे तो परिणामवाचक (Quantitative) नाही. जसे एखाद्याला महात्मा (महान+ आत्मा) किंवा महापुरुषाची उपाधी दिली जाते तेव्हा त्याचा अर्थ असा नव्हे की त्या आत्म्याचा किंवा त्याच्या स्थूल शरीराचा आकार मोठा असतो, त्याचा अर्थ त्या आत्म्याचे गुण महान आणि श्रेष्ठ आहेत.

जेव्हा आत्मा आणि परमात्मा या दोन्ही चैतन्य सत्तांचे अस्तित्व अनादी, अविनाशी आणि स्वतंत्र आहे तेव्हा आत्मा परमात्म्याचा अंश असणे कसे काय शक्य आहे? होय! सर्व आत्में परमात्म्याची संताने अथवा वंशज असल्यामुळे त्यांच्यामध्ये पित्याचे ईश्वरी गुण, पवित्रता, सुख, शांती काही अंशी पितृक संपत्तीच्या रुपाने विद्यमान असू शकतात. म्हणून हे सिद्ध होते की परमात्मा आणि आत्मा या भिन्नभिन्न सत्ता आहेत. परमात्मा एक आहे आणि आत्मे अनेक आहेत. आत्मा पावन होऊन पुण्यात्मा, महात्मा, धर्मात्मा किंवा देवात्मा बनू शकतो परंतु परमात्मा बनू शकत नाही किंवा आपले स्वतंत्र, अविनाशी अस्तित्व परमात्म्यामध्ये विलीन करु शकत नाही. आत्मा परमात्मा होणे हा मिथ्या विचार आहे. परमात्म्यासाठी सदैव एकवचन परंतु अन्य आत्म्यांसाठी बहुवचनाचा प्रयोग केला जातो. जसे—आत्म्यांनो, महात्म्यांनो, देवात्म्यांनो इत्यादी म्हणण्यात येते परंतु "हे परमात्म्यांनो" असे कधीही म्हटले जात नाही. म्हणून परमात्मा एक आहे व अन्य आत्मे स्वतःला केव्हाही परमात्मा म्हणवून घेऊ शकत नाहीत. स्वतःला शिव मानणे अथवा 'शिवोऽहम्' म्हणणे फार मोठी चूक आहे.

बहुधा असे आढळून येते की शिवलिंगाच्या बरोबरच त्याचे

सदृश परंतु त्यापेक्षा लहान आकाराच्या पुष्कळशा प्रतिमा, ज्यांना शालिग्राम असे म्हणतात, पूजल्या जातात. ज्याप्रमाणे शिवलिंग, परमात्मा शिव याचे चिन्ह आहे, तद्वतच शालिग्राम विभिन्न आत्म्यांचे द्योतक आहे. परमात्मा आणि इतर सर्व आत्म्यांच्या गुणांत भिन्नता आहे परंतु आत्मा–परमात्म्याचे रूप एकसमान म्हणजेच ज्योतिर्बिंदुस्वरूपच आहे. केवळ परमात्म्याच्या परमतेला प्रकट करण्यासाठी शिवाचे रूप शालिग्रामापेक्षा मोठे दाखविले जाते. अन्य आत्म्यांमध्ये देह धारण करण्याचे संस्कार असल्यामुळे ते जन्ममरणाच्या चक्रात येतात परंतु परमात्मा या सृष्टीचक्रात, पाचहजार वर्षात एकदाच म्हणजेच कल्पाच्या अंतिम समयाला अलौकिक रीतीने अवतरित होऊन आपले दिव्य कर्तव्य करतो. इतर आत्मे सृष्टिचक्रामध्ये अर्धा कल्प पावन राहतात आणि नंतरच्या अर्ध्या कल्पात पतित बनतात. परंतु पतित–पावन परमात्मा शिव नेहमीच पावन राहतो. म्हणूनच त्याला 'सदाशिव' असे म्हणतात.

## परमात्म्याची कर्तव्ये व त्रिदेवांची निर्मिती

श्रेष्ठ कर्तव्यामुळेच कुणाचीही महिमा होते किंवा महानता प्रकट होते. परमपिता परमात्मा शिव साऱ्या सृष्टीचा पिता असल्यामुळे त्याचे दिव्य आणि कल्याणकारी कर्तव्य हे अखिल विश्वासाठी असते. साधारणतः कुणालाही असा प्रश्न विचारला की परमात्मा काय करतो, तर सर्वसम्मत उत्तर असेच मिळेल की या जगातील सर्वच कर्मे परमात्म्याच्या शक्तीमुळेच होतात. सर्व कर्मांचे निमित्त परमात्माच आहे.त्याच्या हुकुमाशिवाय एक पानही हलू शकत नाही. आता गंभीरपणे आणि विवेकपूर्वक विचार करा की या जगात चांगली आणि वाईट अशा दोन्ही प्रकारची कर्मे होत असतात. वाईट कर्मांचे फळ दुःखदायी व चांगल्या कर्मांचे फळ सुखदायी होते. तर मग ज्यामुळे अन्य आत्म्यांना दुःख होते अशी वाईट कर्मे परमात्माच करतो असे समजावयाचे का ! समजा, एखादा आवेशात येऊन दुसऱ्या व्यक्तीला चाकूने भोसकतो, तर काय अशा हिंसक

कर्माचा कर्ता परमात्माच आहे असे मानावयाचे? परमात्म्याला तर सदा दुःखहर्ता-सुखकर्ता म्हटले जाते. तेव्हा त्याचे कर्म केव्हाही दुःखदायी होऊ शकणार नाही. जर पापकर्म व पुण्यकर्म परमात्माच करीत असेल तर त्याची बरी-वाईट फळे आत्म्यांना का भोगावी लागतात? मग ''जो करील तो भरील, जसे पेराल तसे उगवेल'' असे का म्हणण्यात येते? परमात्म्याचे तर गायन आहे की तो कर्मातीत आहे, तो सच्चिदानंदस्वरूप आहे. यावरुन स्पष्ट होते की आपआपल्या बऱ्या वाईट कर्माची फळे आत्मे इथे भोगतात. म्हणून हे लक्षात ठेवावयास हवे की प्रत्येक आत्मा कर्म करण्यासाठी पूर्ण स्वतंत्र आहे. तो काही परमात्म्याच्या हातातील कळसूत्री बाहुले नाही. परमात्म्याचे नाव, गुण इतर देहधारी मनुष्यात्म्यांपेक्षा भिन्न आहे, तर मग परमात्म्याचे कर्म देखील लौकिक नसून अलौकिक असावयास हवे. लोक समजतात की या जगात फळे, फुले, झाडे इत्यादींची निर्मिती, पालन, विनाश परमात्माच करतो. परंतु हे सर्वकाही अनादी काळापासून प्राकृतिक नियमांनुसार होत आहे. हे काही परमात्म्याचे कर्तव्य नव्हे. मनुष्यात्मा जन्माला येणे, जीवन जगणे किंवा मरणे हे त्याच्या कर्मावर आधारित आहे.

जर एखाद्याच्या घरी मुलगा जन्माला आला तर समजतात की तो ईश्वराने दिला आणि काही दिवसानंतर तो मरण पावला तर लोक त्याचेही निमित्तमात्र परमात्म्यालाच मानतात. परमात्म्याचे असे सीमित तसेच एकेक माणसाकरिता व्यक्तिगत कर्म नसते, तर त्याचे कर्म सर्वांसाठी आणि अपरिमित असते. वास्तविक पाहता परमात्म्याचे कर्तव्य संपूर्ण सृष्टीचक्रामध्ये एकदाच होते, आणि ते म्हणजे जेव्हा साऱ्या जगाची दशा विकारांमुळे अतिशय दुःखी आणि अतिअशांत होते तेव्हा परमात्मा येऊन त्याचे कल्याण व सद्गती करतो. म्हणूनच परमात्म्याला "बिगडी को बनानेवाला'' अथवा ''पतित-पावन'' म्हणतात. हा उद्देश पूर्ण करण्यासाठी परमात्म्याला तीन अलौकिक कर्तव्य पार पाडावी लागतात.

## त्रिमूर्ती शिव



ब्रह्माद्वारे स्थापना    विष्णूद्वारे पालन    शंकराद्वारे विनाश

१. ईश्वरी ज्ञानाद्वारे सत्यता, पवित्रता आणि शांतीची स्थापना.
२. असत्यता, अपवित्रता व अशांतीचा विनाश.
३. धर्मपरायण, पवित्र आत्म्यांचे संरक्षण, पालन, तसेच त्यांची समृद्धी व वृद्धी.

ज्याप्रमाणे एखाद्या देशाच्या राष्ट्रपतीच्या अधिकाराखालील मंत्रिमंडळ त्याच्या आदेशानुसार विविध खात्यांचा कारभार सांभाळते, त्याचप्रमाणे "कर्ता–करविता निराकार शिव" परमात्म्यालाही वर नमूद केलेली तीन कर्तव्ये करवून घेण्यासाठी तीन **सूक्ष्म देहधारी**, देवता–क्रमशः ब्रह्मा, विष्णू, शंकर यांना निर्माण करावे लागते. म्हणूनच शिव परमात्म्याला 'त्रिमूर्ती शिव' म्हटले जाते. असे पुष्कळ पुरावे सापडतात ज्यामुळे शिव परमात्मा त्रिमूर्ती असण्याचे समर्थन होते. उदाहरणार्थ :–

(१) शिवलिंगावर जे आडवे 'त्रिपुंड' लावतात, त्यातील तीन रेखा शिव भगवान त्रिमूर्ती असल्याचे सूचवितात.

(२) शिव परमात्म्याला जे बेलपत्र वाहतात, त्याची तीन पाने तो त्रिमूर्ती असल्याचे द्योतक आहे.

(३) शिवलिंगाला पुष्कळ ठिकाणी ॐकार, ॐकारेश्वर असे देखील म्हणता. ॐ शब्दातील तीन अक्षरे अ, उ, म् परमात्मा शिवाच्या ब्रह्मा, विष्णू, शंकर द्वारे क्रमशः स्थापना, पालन, विनाश या तीन कर्तव्यांना, तसेच चंद्रबिंदू ( ँ ) खुद्द ज्योतिर्बिंदू परमात्मा शिवाला स्पष्ट सूचित करतो.

(४) अन्य धर्मात व भाषांत देखील परमात्म्याला ज्या शब्दांनी संबोधतात ते शब्दही तीन अक्षरांचे आहे. उदा. ॐ, GOD इत्यादी. GOD ह्या इंग्रजी शब्दातील तीन अक्षरे परमात्म्याची तीन कर्तव्ये स्पष्ट करतात. जसे –

G म्हणजे Generation (उत्पत्ती)
O म्हणजे Operation (पालन, समृद्धी, वृद्धी)
D म्हणजे Destruction (विनाश)

(५) वर्तमानकालीन भारत सरकारच्या राजनैतिक चिन्हातील (Coat of arms) त्रिमूर्ती सिंह वास्तविक तीन आकारी देवता–ब्रह्मा, विष्णू आणि शंकर यांना न जाणल्यामुळे दाखविला गेला आहे.

ब्रह्मा, विष्णू, शंकर या तीन देवतांचे आपापले स्वतःचे अस्तित्व आहे. परमात्मा शिव जो ह्या तिन्ही देवताचा निर्माता आहे, त्याची सत्ता या तिघांपेक्षा भिन्न आहे.

**शिव आणि शंकर यांमधील भेद**

साधारणतः लोक शिव आणि शंकर यांना एकाच सत्तेची दोन नावे समजतात, परंतु वास्तविक शिव आणि शंकर एक नाहीत. शंकर तर परमात्मा शिवाच्या त्रिदेव–निर्मितीमधील एक आहे. शंकराचे रूप सूक्ष्माकारी आहे तर शिव निराकारी आहे. शिव कल्याणकारी परमपिता परमात्म्याचे नाव आहे आणि आकारी देवता शंकर तमोगुणी आसुरी सृष्टीचा विनाश करण्याकरिता निमित्त आहे. बऱ्याचशा चित्रांमध्ये शंकर शिवलिंगाकडे बोट दाखवून पार्वतीला योग–साधना करण्याकरिता शिवाचे ध्यान करण्यास सुचवीत आहे असे दाखविण्यात येते. यावरुन देखील शिव आणि शंकर यांमधील अंतर स्पष्ट होते.

तेव्हा ब्रह्मा, विष्णू, शंकर तिन्ही सूक्ष्माकारी प्रकाशस्वरूप देवता आहेत, ज्यांना केवळ दिव्यचक्षुद्वारेच पाहता येणे शक्य आहे. त्यांना परमात्मा म्हणता येणार नाही कारण या सर्वांचा निर्माता परमपिता परमात्मा शिव आहे.

**परमात्म्याचे धाम व तीन लोक**

परमात्म्याला त्रिमूर्ती (तीन देवतांचा निर्माता), त्रिनेत्री (दिव्यबुद्धीरूपी ज्ञानाचा तिसरा नेत्र देणारा), त्रिकालदर्शी (अर्थात सृष्टीच्या आदि–मध्य–अन्ताचा ज्ञाता) असे संबोधतात. तसेच त्याला 'त्रिलोकीनाथ' अथवा 'त्रिभुवनेश्वर' असेही म्हणतात. यावरून तीन लोकांचे अस्तित्व सिद्ध होते.

(१) एक आहे ही साकार मनुष्यसृष्टी किंवा स्थूललोक जेथे आपण राहतो. ही आकाश, वायू, अग्नी, जल आणि पृथ्वी या पाच तत्त्वांची बनलेली आहे. या सृष्टीला कर्मक्षेत्र असेही संबोधतात. कारण येथे मनुष्य जसे कार्य करतो त्याप्रमाणे मग फळ अवश्य भोगतो. या 'लोका'मध्ये राहणाऱ्यांना हाडामांसाचे शरीर असते. या लोकातच जन्म–मरण आणि सुख–दुःखाचा विराट खेळ चालतो. म्हणून या सृष्टीला विराट रंगभूमी अथवा लीलाधाम (ज्यामध्ये सूर्य आणि चंद्र जणू काय मोठमोठाले दिवे आहेत) असेही म्हटले जाते. याच सृष्टीवर संकल्प, वचन आणि कर्म तीन्हीही आहेत. ही साकारसृष्टी आकाशतत्त्वात अंशमात्र व्यापून आहे. स्थापना, विनाश आणि पालन इत्यादी परमात्म्याची दिव्य कर्तव्ये याच साकारलोकाशी संबंधित आहेत.

(२) सूर्य, चंद्राच्याही पलिकडे आणि या मनुष्यलोकातील आकाशतत्त्वाच्याही वर एक अति सूक्ष्म लोक आहे, ज्यामध्ये प्रथम पांढऱ्या प्रकाशतत्त्वात ब्रह्मापुरी, तिच्यावर सोनेरी लाल प्रकाशतत्त्वामध्ये चतुर्भुज विष्णूपुरी आणि तिच्याहीवर महादेव–शंकराची पुरी आहे. या तिन्ही सूक्ष्म आकारी देवतांच्या पुरींना मिळून ''सूक्ष्मलोक'' असे म्हणतात. कारण या देवतांची शरीरे वस्त्रे, दागिने इत्यादी पाच तत्वांची नसून सूक्ष्म प्रकाशतत्त्वाची बनलेली असतात. या देवतांना किंवा त्यांच्या पुरींना या चर्मचक्षूंनी आपण पाहू शकत नाही परंतु दिव्य चक्षूनेच त्यांचा साक्षात्कार होऊ शकतो. तेथे संकल्प व गती आहे परंतु वाणी किंवा ध्वनी नाही. तेथील आकारी

देवता जेव्हा बोलतात तेव्हा त्यांचे मुख तर हलते, परंतु मनुष्यलोकात बोलल्यामुळे जसा आवाज होतो तसा आवाज तेथे होत नाही. या लोकात मृत्यू, दुःख किंवा विकार यांचे नाव-निशाण नसते. धर्मराजपुरी याच सूक्ष्माकारी लोकात आहे.

(३) तिसरा आहे निराकार लोक. तो देवतांच्या सूक्ष्माकारी लोकांच्याही वर असून तेथे असीमितरूपाने पसरलेला तेजस्वी–सोनेरी लाल रंगाचा प्रकाश आहे. यालाच अखंड–ज्योती–महतत्त्व अथवा "ब्रह्मतत्त्व" म्हणतात. हे ब्रह्मतत्त्व पाच प्राकृतिक तत्त्वांपेक्षाही अतिसूक्ष्म आहे. त्यामुळे या तत्त्वाचा साक्षात्कारही फक्त दिव्य चक्षूद्वारेच होऊ शकतो. या ब्रह्मतत्वाच्या अंशमात्रात बिंदुस्वरूप ज्योतिर्लिंगम् , परमपिता परमात्मा शिव आणि सर्व धर्मांचे आत्मे आपापल्या विभागांत (Sections) आत्म्याच्या अव्यक्त वंशावली वृक्षाच्या (Geneological Tree) रूपात निवास करतात. या स्थानाला ब्रह्मलोक, परलोक, मुक्तिधाम, शांतिधाम, निर्वाणधाम, मोक्षधाम अथवा शिवपुरी असे म्हणतात. या लोकात संकल्पही नाही व कर्मही नाही, म्हणून तेथे सुख किंवा दुःख नाही. परंतु तेथे या दोन्हीपेक्षा वेगळीच अवस्था असते. तेथे अपवित्रता किंवा विकार मुळीच नसतात. या पवित्र धामात कोणी अपवित्र, कर्मबंधनयुक्त देहधारी जाऊच शकत नाही. त्या ठिकाणी आत्मा अकर्ता, अभोक्ता आणि निर्लिप्त अवस्थेत असतो. येथे प्रत्येकाचे मन सुप्त, शांत अथवा बीज अवस्थेत असते. सृष्टिलीलेच्या अनादी व निश्चित योजनेनुसार जेव्हा एखाद्या आत्म्याची सृष्टिरूपी रंगमंचावर भूमिका असते, तेव्हा तो आत्मा साकारलोकात येऊन शरीररूपी वस्त्रे धारण करतो व आपापला अभिनय करण्यासाठी उपस्थित होतो. बहुधा दुःख व अशांतीच्या वेळेस जेव्हा लोक परमात्म्याची प्रार्थना करतात तेव्हा ते ऊर्ध्वमुख होऊन हात जोडतात. कारण जाणता-अजाणता परमात्मा वर राहतो ही स्मृती सर्व धर्मांच्या आत्म्यात सामावून राहिलेली आहे. परम आत्म्याचे धाम असल्यामुळे परमधाम या

नामानेही प्रसिद्ध आहे. या वेळेस येथे एका चुकीच्या समजुतीचे निराकरण करणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे लोक ब्रह्मतत्वालाच भगवान मानतात. वास्तविक परमात्मा व आत्म्यांचे ते निवासस्थान आहे. ज्याप्रमाणे प्रत्येक चमकणारी वस्तू सोने असू शकत नाही, त्याचप्रमाणे अचेतन, प्रकाशमय ब्रह्मतत्त्वाला ज्योतिर्बिंदुस्वरूप परमात्मा मानणे, "अहम् ब्रह्मास्मि" किंवा "सर्व खल्विदम् ब्रह्म" म्हणणे अक्षरशः चूक आहे. हयाच कारणामुळे या अचेतन ब्रह्मतत्त्वाशी योग लावून मनुष्यात्मे शक्तिशाली अथवा पावन बून शकले नाहीत. कारण अचेतन वस्तूपासून शक्ती कशी मिळू शकेल ?

**शिवरात्री अथवा परमात्म्याचे दिव्य अवतरण**

परमात्म्याचे नाव शिव अर्थात कल्याणकारी असण्याचे कारण असे की धर्मग्लानीच्या वेळेला जेव्हा सर्व मनुष्यात्मे माया अर्थात पाच विकारांच्या अधीन झाल्यामुळे दुःखी, अशांत, पतित आणि भ्रष्टाचारी होतात तेव्हा त्यांना पुन्हा सुखी, शांत, पावन आणि श्रेष्ठाचारी बनविण्याचे कल्याणकारी कर्तव्य तो स्वतः करतो. परमपिता परमात्मा ब्रह्मलोकात निवास करतो, तेव्हा त्याची अवस्था निःसंकल्प तथा निष्क्रिय (कर्मरहित) असते. म्हणूनच परमात्म्याला कर्मभ्रष्ट व धर्मभ्रष्ट जगाचा उद्धार करण्यासाठी 'ब्रह्मलोकातून' खाली येऊन रंगमचावर ज्या आत्म्याचे पूर्ण ८४ जन्म झाले आहेत, अशा विशेष आत्म्याच्या जीवित साधारण वृद्धशरीरात प्रवेश करावा लागतो. त्याच वृद्ध मनुष्याचे कर्तव्यवाचक नाव परमात्मा 'प्रजापिता ब्रह्मा' असे ठेवतो. परमात्मा शिवाच्या या अवतरणाची अथवा दिव्य व अलौकिक जन्माची पुनीत स्मृती म्हणजेच 'शिवरात्री' अथवा 'शिवजयंती'. या सणाचा महोत्सव भारतामध्येच विशेष धूमधडाक्यात साजरा केला जातो. कारण भारतच परमात्म्याची 'अवतरण भूमी' व पावन 'कर्म–भूमी' आहे.

शिवरात्रीचा सण भारतीय वर्षाच्या शेवटी म्हणजे फाल्गुन मासात येतो. त्या दिवशी कृष्णपक्षाच्या चतुर्दशीला पूर्ण अंधकार असतो. त्यानंतर शुक्लपक्षाचा आरंभ होतो. ही फाल्गुन मासातील कृष्णचतुर्दशीची अंधारी रात्र म्हणजेच आत्म्यांनी गाठलेल्या अज्ञान-अंधकार, विकार आणि आसुरी लक्षणांनी युक्त अशा अवस्थेच्या शेवटच्या पायरीचे द्योतक आहे. त्याच्यानंतर आत्म्यांचा शुक्लपक्ष म्हणजे नव्या कल्पाचा आरंभ होतो. म्हणजे अज्ञान आणि दुःखाचा अंत होऊन पवित्र आणि सुखाचा काळ सुरू होतो.

परमात्मा शिव अवतरित होऊन आपल्या ज्ञान, योग तथा पवित्रतेद्वारे सर्व आत्म्यांमध्ये आध्यात्मिक जागृती उत्पन्न करतो. याच परम व श्रेष्ठ कर्तव्याची स्मृती म्हणून भक्त लोक शिवरात्रीला जागरण करतात. शिव आणि शंकर यातील अंतर न समजल्यामुळे ते शंकराला धुंद योगी समजून स्वतःला कृत्रिम रूपाने धुंद करण्यासाठी भांग, चरस, गांजा इत्यादी मादक द्रव्यांचे त्या दिवशी खूप सेवन करतात व जास्तच विकाराधीन होतात. परंतु खरी धुंदी परमात्मा शिवापासून मिळणारे ज्ञानामृत प्राशन करूनच चढते हे त्या बिचाऱ्यांना माहितच नसते. त्या दिवशी लोक बहुधा उपवास किंवा व्रत करतात. उपवासाचा वास्तविक अर्थ आहे (उप–जवळ आणि वास–राहणे) परमात्म्याजवळ जाणे. आता परमात्म्याशी योगयुक्त होण्याकरिता निर्विकारी राहण्याचे म्हणजे पाच विकारांच्या अधीन न होण्याचे व्रत घेण्याची आवश्यकता आहे. परमात्म्याच्या अवतरणाची आवश्यकता व त्याची अवतरित होण्याची वेळ पूर्णतया समजण्यासाठी युगांच्या सृष्टिचक्राला समजून घेणे आवश्यक आहे. (**सृष्टिचक्राचे चित्र पृष्ठ १८ वर पाहा.**)

## कलियुगात विद्वानांची सर्वात मोठी चूक

आज मनुष्यात्मे परमपिता परमात्म्याला विसरून गेले आहेत. ते परमपिता परमात्म्याला नाव-रूपाहून वेगळा अथवा सर्वव्यापी मानत असल्यामुळे योगभ्रष्ट झाले आहेत आणि म्हणूनच पवित्रता,

सुख व शांती या ईश्वरी जन्मसिद्ध अधिकारापासून वंचित झाले आहेत. जर मनुष्यमात्राला हे ज्ञान असते की ''शिव''च परमपिता परमात्मा आहे व गीताज्ञानही त्यानेच दिले होते तर आज ही भारतभूमी स्वर्गभूमी झाली असती.

**परमात्मा जन्ममरणापासून अलिप्त आहे**

या मनुष्यसृष्टीची तुलना एका चक्राशीही (चित्र – पृष्ठ १८ वर) केली जाते. प्रत्येक मनुष्यात्मा जन्ममरणाच्या चक्रात येतो. कोणीही मनुष्यात्मा जन्म-मरणापासून मुक्त नाही. प्रत्यक्ष सर्वगुणसंपन्न श्रीकृष्ण व मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम यांनीही लौकिक जन्म घेतला होता व देहही ठेवला होता. फक्त परमात्माच या चक्रापासून सदा अलिप्त आहे, कारण तो कर्मातीत आहे. मृत्युंजय अमरनाथ अथवा अकालमूर्त अशी महिमा ज्योतिर्बिंदुस्वरूप शिव परमात्म्याचीच आहे.

स्पष्टच आहे की जन्ममरणाच्या चक्रापासून सदा अलिप्त असणाऱ्या शिवाशी योग लावल्यास मनुष्यमात्राला या चक्रापासून मुक्तता केवळ कलियुगाच्या शेवटी व सत्ययुगाच्या प्रारंभी म्हणजेच वर्तमानकालीन पुरुषोत्तम संगमयुगातच मिळू शकते.

**परमात्म्याचा संक्षिप्त परिचय**

**दिव्य नाव : त्रिमूर्ती शिव**

**दिव्य रुप : ज्योतिर्बिंदू**

**निवासस्थान : परमधाम किवा ब्रह्मलोक**

**दिव्यगुण : ज्ञानसागर पवित्रता, प्रेम, शांती आणि आनंदाचा सागर, सर्वशक्तिमान**

**दिव्य कर्तव्य : एका सत्य धर्माची स्थापना आणि अनेक धर्मांचा विनाश, पतिताला पावन करणे.**

**अवतरणाची वेळ : कलियुगाचा अंत आणि सत्ययुगाचा प्रारंभ यामधला काळ अर्थात पुरुषोत्तम संगमयुग.**

# सृष्टि-चक्र




प्रकाशक- मराठी साहित्य विभाग
प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व-विद्यालय
इंद्रप्रस्थ भवन, 8-अ, वसंत नगर, नागपूर-440 022
☎9373225747, 2246793, 2225746
ईमेल : vasantnagar.ngp@bkivv.org

# प्रजापिता ब्रह्माकुमारीज ईश्वरीय विश्व-विद्यालय
## पांडव भवन, आबू पर्वत, राजस्थान
### संपूर्ण विश्वात एकूण 8500 सेवाकेंद्रे आहेत
### महाराष्ट्रातील सेवाकेंद्रे

**मुंबई**-22 : 19,नरोत्तम निवास, किंग सर्कल स्टेशन जवळ सायन..... फोन: 24073015
**मुंबई**-56 : 'ओमशांति', स्वस्तिक सोसायटी, प्लाट नं 48,
एन.एस.3 रस्ता, जुहू योजना, विलेपार्ले..................... फोन: 26160789
**मुंबई**-7 : 23, दर-उल-मुलूक, पं.रमाबाई रोड, गांवदेवी.............. फोन: 23636585
**मुंबई**-5 : 24-25, 'गीतांजली', रेडिओ क्लबमागे, कुलाबा.......... फोन: 22830494
**मुंबई**-62 : 'आश्रय', 4 रस्ता, एम. जी. रोड,
तिवारी हॉस्पीटलजवळ, गोरेगांव (पश्चिम)................ फोन: 28741882
**मुंबई**-55 : 102, एवरेस्ट, पहिला मजला, नेहरू रोड,
पोस्ट ऑफिसजवळ, शांताक्रुज (पूर्व).......................... फोन: 26103731
**मुंबई**-77 : 23-24, शंकरछाया, 19 म. गांधी रोड, घाटकोपर (पूर्व) फोन: 25093700
**मुंबई**-80 : गालामानोर, प्लाट नं. 544 बी,
ब्लाक नं. 3,4,5 एन. एस. रोड, मुलुंड (पश्चिम).......... फोन: 25617393
**मुंबई**-92 :बी/6 गार्डन व्ह्यू अपार्टमेंट, चंदावरकर लेन, बोरीवली(प.) फोन: 28903896
**नागपूर**-22: **(मराठी साहित्य व पत्र-पाठ्यक्रम)**. 'इंद्रप्रस्थ', 8-अ, वसंत नगर, फोन:
2246793, 9373225747, 2225746, **Email : vasantnagar.ngp@bkivv.org**
**पुणे**-37 : 19/377, मिरा सोसायटी, शंकर शेट रोड.............. फोन: 26450767
**पुणे**-2 :111,कावेरी अपार्टमेंट, आंबेडकर कॉलेज जवळ,क्वाटर गेट फोन: 26353327
**पुणे**-1 ; अे-12, 'शांतीकुंज' जी.पी.ओ. समोर......................... फोन: 26122525
**नासिक**-3 : 4612, ओल्ड आग्रा रोड, भागवत निवास,
पंचवटी सेवाकुंज समोर........................................ फोन: 2518484
**अमरावती**-6 : 'सुखशांती भवन', विजय कॉलनी......................... फोन: 2574397
**अकोला**-1 : टी/3 किर्तीनगर, गोरक्षण रोड, (R.T.O.) जवळ...... फोन: 2458547
**औरंगाबाद**-5 : सुख शांती भवन, 30/35 भानुदास नगर ............ फोन: 2342199
**चंद्रपूर**-2 : 'तपस्या भवन', भानापेठ, वार्ड नं. 2, कस्तुरबा रोड....... फोन: 253574
**कोल्हापूर**-2 : 2397, शिवाजी पेठ, तटाकडील तालीम गल्ली........ फोन: 2629421
**सोलापूर**-2 : 'शिवप्रकाश भवन', 15/18 अ, कारंबा रोड, सम्राट चौ. फोन: 2325671
**जळगांव**-1 : 'ओमशांती भवन', ढाके कॉलनी, ब्रह्माकुमारीज मार्ग.... फोन: 2236259
**भुसावळ**-1 : 'राजयोग भवन', यावल रोड............................ फोन: 222949
**भंडारा**-4 : 'शिव स्मृती भवन', कृष्ण मंदिर वार्ड..................... फोन: 252168
**वर्धा**-1 : गोपूरी, साठवणे ले-आऊट, पवनार नाका.................... फोन: 242323
**यवतमाळ**-1 : 'सुख शांती धाम', 74, ओम सोसायटी, अमी रोड.... फोन: 246615
**बुलढाणा**-1 : एकता नगर, पोस्ट क्वार्टर्सच्या मागे, सर्क्युलर रोड...... फोन: 242724
**लातूर**-31 : 'राजयोग भवन', ओल्ड औसा रोड, नंदी स्टॉप........... फोन: 200097

**मलकापूर**-1 : जिल्हा बुलढाणा, 40 बीघा, बंदे फ्लोर मिल जवळ..... फोन: 260386
**नांदेड**-5 : 'सुख शांती भवन', कैलाश नगर........................ फोन: 251649
**सांगली**-16 : ब्लॉक नं. 4, प्लाट नं. 5, साखर कारखाना............ फोन: 2310342
**बीड**-22 : 'दिव्य दर्शन भवन', आदर्श नगर, पांगरी रोड............... फोन: 222915
**गोंदिया**-1 : 'स्वदर्शन भवन', न्यू लक्ष्मी नगर.......................... फोन: 250264
**सातारा**-1 : कल्याणी नगर, झेड.पी.कँपच्या समोर .................... फोन: 229795
**मालेगांव**-3 : (जि. नाशिक) 'लाईट हाऊस', 310, संगमेश........... फोन: 250495
**पणजी** (गोवा)-1 : ई-98 माळा................................... फोन: 2226044
**पणवेल**-6 : (जि. कुलाबा) आदिती, प्लॉट नं.107,
रूम नं. 102,103, मीडल क्लास सोसायटी....... फोन: 27452618
**कल्याण**-1 : (जि. ठाणा) 'स्मृती बिल्डिंग', फर्स्ट फ्लोअर,
अहिल्याबाई चौक........................................ फोन: 2209959
**हिंगणघाट**-1 : (जि. वर्धा) 'ज्ञान विज्ञान भवन', 148, यशवंत नगर... फोन: 245028
**गडचिरोली**-5 : 'शिवशक्ति भवन', शिवाजी वाचनालयाजवळ ....... फोन: 232442
**देगलूर**-17 : (जि. नांदेड) 'अमृतकुंड', दत्त कृपा सोसायटी-2......... फोन: 255607
**उदगीर**-17 :(जि.उस्मानाबाद) 'सद् भावना भवन', 3-2-1014/1,
ओमशांती कॉलनी....................................... फोन: 256340
**उमरेड**-3 : (जि. नागपूर) 'पावन धाम', कावरा पेठ................... फोन: 242787
**वरूड**-6 : (जि. अमरावती) 'ज्ञानदीप भवन', गोमापूरवाई............. फोन: 234073
**पुसद**-4 : (जि. यवतमाळ) 'आत्मदर्शन भवन', विठाबाई नगर........ फोन: 248333
**परतवाडा**-5 : (जि. अमरावती) 'शिवदर्शन भवन', मोहन नगर.........फोन: 221353

## भारतातील अन्य सेवा केंद्रे

**दिल्ली**-5 : पांडव भवन, 25 न्यू रोहतक रोड, करोल बाग............ फोन: 23628976
**कोलकाटा**-20 : 1/अ, आशुतोष मुखर्जी रोड........................फोन: 24753521
**अहमदाबाद**-22 : 'सुखशांती भवन', भुलाभाई पार्क रोड, कांकरिया.. फोन: 25324360
**चेन्नई**-40 : 'शांतिधाम', प्लॉट नं. 3702-96, 3रा एव्हेन्यू अन्नानगर. फोन: 26267441
**चंदीगड**-20 : 'राजयोग भवन', सेक्टर 33 अे.................... फोन: 2601339

## OVERSEAS

**LONDON**-NW 10-2 HH : Global Co-operation House, 65
Pound Lane, Ph : 44-20-8727 3350
**NEW YORK**, 10017:Brahmakumari's Office at U.N.Room
No. 436, 866 UN Plaza (Ph :1-212-688 1335)
**NAIROBI**- (Kenya) Global Museum, Maua close, Westlands,
PO Box 123-00606-Ph-254-20-3743572, 3741239
**SYDNEY** NSW 2131- 'Indraprasth' 78 Alt Street
Ashfield ....Ph : 61-2-9799 9880
**PARIS**-75020, 74 Rue Orfila, Ph : 33-1-4358 4427
**BERLIN** Crellestr,-26...Ph-49-30-7813059
**GENEVA** (Switzerland) : 12 rue. de cour 86, Ph 41-21-7223610